International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000143 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# अर्धा कोयता आणि लैंगिक छळ

**कामिनी आशा हिरामण पवार * & डॉ.प्रा.नजीर शेख ****

**लेखक संलग्न:**

* संशोधक विद्यार्थी, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय आंबेजोगाई. बीड. संलग्न-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. (महाराष्ट्र).

** संशोधक मार्गदर्शक, मानवलोक समाजकार्य महाविद्यालय,आंबेजोगाई. जिल्हा. बीड. संलग्न-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. (महाराष्ट्र).

**लेखक संदर्भ:** पवार, कामिनी., & शेख, नजीर. (2024). अर्धा कोयता आणि लैंगिक छळ. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 4 (4), pg. 29-33. ijcrta.org

**सारांश:**

सदरील शोध निबंधाच्या माध्यमातून अर्ध्या कोयत्याची संकल्पना तसेच अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या ऊस तोड कामगार महिलांना, कामाच्या ठिकाणी सहकामगार मुकादम, पोटमुकादम, फडमालक, स्थानिक शेतकरी, गावगुंड व उनाड मुलांमुळे आणि यांच्याकडून होणाऱ्या शेरबाजी, पाठलाग, अपशब्द, किळसावणे स्पर्श, बोचणारी नजर यासारख्या छळाना वारंवार सामोरे जावे लागते; या समस्येवर भाष्य करण्यात आलेले आहेत.

एकल ऊस तोड कामगार महिलांच्या अनुभवांवर लक्ष्य केंद्रित करून लैंगिक छळाच्या कारणांचे विश्लेषणात्मक अध्ययन सदरील सोधनिबंधात गुणात्मक अध्यनासाठी मिश्र संशोधन पद्धतींचा दृष्टिकोणातून अर्ध्या कोयत्याने ऊस तोडी करणाऱ्या महिलांच्या असुरक्षिततेसाठी कारक घटक आणि लैंगिक छळांच्या मुळ कारणांचे निराकरण करणारे निष्कर्ष या शोधनिबंधातून स्पष्ट होतात.

**शब्द संकेत:** अर्धाकोयता, ऊस तोड कामगार, लैंगिक छळ, गावगुंड, फडमालक, मुकादम, पोट मुकादम, शेरेबाजी इ.

**प्रस्तावना:**

ऊस तोडीचे काम म्हटलं की, अगदी जीवावर बेतणारे. त्या कामासाठी जीवाचे अगदी रान करावे लागते. घरपासून, गावापासून, जिल्हयापासून दूर हंगामी स्थलांतर करावे लागते. ऊस तोडीसाठी स्थलांतर करणारे कामगार लाखोंच्या संखेने बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यामधील आहेत. ऊस जितका गोड तितकाच कडू अशी त्याची साखर बनवण्याची प्रक्रिया आहे. अगदी विंचविणे आपलं बिऱ्हाड पाठीवर घ्याव तसंच आहे.

साधारणपणे ऑक्टोबर ते नोव्हेंबरच्या दरम्यान विविध गावांतील आणि वस्त्यांमधील कामगार ऊस तोडी साठी स्थलांतर करतात. हे कामगार काम करून साखर कारखान्यांना जारी ऊस पुरवत असले तरी कारखाना या मंजुरानां आपले कामगार मनात नाही.

ऊस तोडीचे काम हे स्त्री-पुरुषांच्या जोडीनि केले जाते. या जोडीला एक कोयता असे संबोधले जाते. परंतु जे स्त्री किंवा पुरुष एकट्याने उछल घेऊण ऊस तोडीसाठी जातात त्यांना अर्धा कोयता असे संबोधले जाते. परंतु अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या पुरूषांचे प्रमाण हे अतिशय नगण्य आढळून येते, बीड जिल्ह्यातून ऊसतोडीसाठी स्थलांतर करणाऱ्या एकल महिलांचे प्रमाण खूप जास्त आहे. कारण हा जिल्हा औद्योगिक विकासात मागासलेला, निसर्गावर आधारित शेती, कमी पर्जन्य तसेच सातत्याने भेडवणारे दुष्काळ, म्हणून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अर्थार्जन व्हावे म्हणून ऊसतोडीची उचल वर्षभर थोड्या-थोड्या प्रमाणात या महिला मुकदमाकडून घेतात कारण यासाठी त्यांना व्याज किंवा गहनखात करावे लागत नाही. मुलाबाळांचे शिक्षण शेतीचा खर्च तसेच कुटुंबातील सर्व प्राथमिक गरजा या उचलीच्या माध्यमातून भागावल्या जातात.

एकल ऊस तोड कामगार महिलांना अर्धा कोयता या संज्ञाने संबोधले जाते. ऊसतोडीवर कामाच्या ठिकाणी या महिलांना सोबतीला कोणी पुरुष नसल्याने आपली सर्व कामे एकटीने करावी लागतात. पिण्याचेपाणी,बाजार,दळण इ. आणण्यासाठी दूर अंतरांवर जावे लागते. अशावेळी तिची पाळत ठेऊन शेरेबाजी करणे, वाईट इशारे करणे, किळसावणे आवाज काढणे, पाठलाग करणे, असा छळ एखादा सहकामगार,ट्रक किंवा ट्रॅक्टर चालक,पोटमुकादम, फडमालक स्थानिक शेतकरी अथवा उनाड मुले यांच्याकडून तिच्या एकटेपणाचा फायदा घेत संधि साधली जाते.

गावापासून दूर असल्याने पुढचे काही दिवस किंवा महीने त्याच ठिकाणी काम करावे लागणार असल्यामुळे या महिला या छळाच्या विरोधात पाऊल उचलत नाही. एकमुळे सर्व टोळीला त्रासस दिला जाऊ नये म्हणून हे अत्याचार सहन करत जीवावर उदार होऊन ऊसतोडीचे काम अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिल्या करत असतात. हा शोधनिबंध लैंगिक छळाच्या करणांवर प्रकाश टाकणार आहे.

**संदर्भ साहित्य आढावा :-**

नागरगोजे दिपक (२०२३). गुलामांच जीण, अंधारतला जगणं या समकालीन प्रकाशन पुणे, यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकात पान क्रमांक ३४ वर २०१५ साली हिनजवडी पुणे येथे ऊसतोड कामगाराच्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचारविषयी नमूद केले आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या जीवनावर प्रकाश सदरील पुस्तकाट टाकण्यात आलेला आहे. तसेच कामाच्या ठिकाणी कामगारांना दोन प्रकारच्या जनवारांपासून धोका असतो. एक म्हणजे मांसातल्या जानवरांपासून आणि दूसरा म्हणजे रानटी श्वापदापासून असा उल्लेख पान क्रमांक ४२ वर आढळतो, या पुस्तकात ऊसतोड कामगारांच्या जीवनातील विविध समस्यांना सखोलपने मांडून यावर मत करण्यासाठी प्रयत्न आणि दिशा दिलेली आहे.

क्षीरसागर दिपा (२०२१).“झुंज तिची पाचटाशी” मेजेस्टिक पब्लिशिंग हाऊस मुंबई, यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकात लेखिकेने पान क्रमांक १०१ वर ‘शेवंताची घुसमट’ या विषयावर भाष्य करत असताना, मस्साजोग येथील ऊसतोड कामगार मुलीशी अगदी १५ वर्षांची असताना शेजारच्या मुलानं प्रसंग केल्याची नोंद आढळते. तसेच पुढे त्यानंतर त्याने पुन्हा तिला समजावून आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले नंतर वारंवार तिच्यासोबत कुकर्म केले त्यानंतर टी महार जातीतील असल्याने तिला मूल झाल्यावर देखील त्या मुलाच्या घरचे तिला सून म्हणून स्वीकारण्यास तयार नव्हते पान आपलया मुलाची शिक्षा रद्द व्हावी यासाठी ते लग्न लावून देण्यासाठी तयार झाले पान शेवटी ह्या

तडजोडीच्या नात्यात तिची घुसमट चालूच राहिली. फक्त आईवडील ऊसतोडीसाठी आपल्या मुलीस मागे ठेऊन गेले नसते तर हे सगळं कदाचित घडलं नसतं.

**संशोधन विषयाचे महत्व:**

बीड जिल्हा हा मारठवाड्यातील दुष्काळाच्या विळख्यात असणारा जिल्हा तसेच डोंगर पट्ट्यातील शेती ही जमिनीचे पोत आणि पर्जन्य त्याच्या फेऱ्यातून अडकलेली. यातून कमी उत्पन्न आणि कर्जाचे ओझे वाढत जाते. या सगळ्या जाचक परिस्थितीला कंटाळून ऊसतोडी हा पर्याय निवडला जातो.

ऊसतोडी ही कोयत्याने किंवा अर्ध्या कोयत्याने केली जाते. अर्धा कोयता म्हणजे तरुण मुलं-मुली, विधवा, परित्याकीत्या, विवाहित, अविवाहित, प्रौढ, तसेच काही प्रमाणात विवाहित जोडप्या- पैकी एकजण हे अर्ध्या कोयत्याने ऊस तोडण्यासाठी कामाच्या ठिकाणी जातात. यामध्ये ज्या एकल महिला अर्ध्या कोयत्याने ऊसतोडीवर जातात त्यांना अति शारीरिक कष्टाशिवाय इतर मानसिक, भावनिक आणि लैंगिक छळाला सामोरे जावे लागते. म्हणून या शोधनिबंधात या एकल महिलांचा म्हणजे अर्धा कोयता यांचा लैंगिक छळ कशाप्रकारे होतो. त्याची कारणे काय आहेत यांचा सखोल आढावा घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट /उद्देश:**

१) अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिलांना ऊस तोडीच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
२) अर्ध्या कोयत्याने काम करत असताना होणाऱ्या लैंगिक छळाच्या कारणाचे अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधात हा गुणात्मक स्वरूपाचा असून याकरिता व्यष्टि-अध्ययन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून व्यष्टि अध्यनासाठी उद्देशपूर्ण नमूना निवड पद्धतीचा अवलंब करून एकमेकांची निवड करण्यात आली आहे. यानुसार मूलाखत मार्गदर्शिका तयार करून त्या नुसार तथ्य संकलन करण्यात आले.

**व्यष्टि अध्ययन:**

शिला (नाव बदललेले आहे) ही लहान वयातच लग्न करून धारूर तालुक्यातील एक खेड्यात आली. आई-वडिलांसोबत ही ऊसतोडीवर जात असे. ऊस तोडीवरच तिच्या सासरच्या लोकांशी तिच्या आई-वडिलांची ओळख झाली. तिकडेच म्हणजे कर्नाटक राज्यातील कुठल्यातरी गावातील ऊसाच्या फडात लग्न ठरलं, उन्हाळ्यात गावी आल्यावर थाटात लग्न लाऊन देऊ अशी बोली झाली. शिक्षण म्हणजे फक्त नावालाच ४ थी किंवा ५ वी तेही आता आठवत नाही. मग त्यासाली हसत खेळत ऊसतोडीचा सीझन पार पडला, १९९८ ला शिलाचे लग्न तिच्या माहेरी करून देण्यात आले. तेव्हा शिलाचे वे अगदी १४ वर्षच होते. लग्न झाल्यापासून आजपर्यंत ऊसतोडी सुटलेली नाही. वयाच्या १५ व्या वर्षी पहिल आपत्य त्यानंतर दीड ते दोन वर्षाच्या अंतराने अजून दोन बालांतपणं. या लहान-लहान मुलांना सोबत घेऊन सासु-सासरे आणि ह्याचे कोयते ऊसतोडी करत असत. पुढे मुलं शाळेत घातली मग आजी-आजोबा जवळ मुलांना ठेऊन शीला व मदन ऊसतोडीवर जात असत.

एके दिवशी ऊसणे भरलेल्या ट्रक कहा वायर आवळत असताना मदनचा तोल जाऊन तो ३ वायर भरलेल्या ट्रक वरुण खाली कोसळला, या अपघातात मदनला आपला ऊजव हात गमवावा लागला तसेच कमरेच्या मनक्याला ईजा होऊन त्यात अंतर पडले. तो हंगाम पूर्ण न करता शिला आणि मदन गावी परतले. पुढचे काही महीने मदन दवाखान्यातच अंथरूनास खिळून होता. उपचारासाठी कर्ज काढावं लागलं. पुढे हेच कर्ज फेडण्यासाठी मुकदमाकडून उचल घेण्यात आली, तेव्हा पासून शिला अर्ध्या कोयत्याने काम करते.

अर्ध्या कोयत्याने काम करत असताना पिण्याचं पाणी आनण्यासाठी कोपी असतात तेथून दूर जावे लागते. दळण, बाजार, किराणा, यासाठी फड व राहण्याच्या ठिकाणापासून गावात किंवा जवळच्या बाजारात जाणे भाग पडते. अशावेळी सायंकाळी, उशिरा मनात भिती घेऊन आपली कामे एकटीने करावी लागत असत. सोबत टोळीतील इतर सहकारी असले तरी तिच्या संरक्षणाचा प्रश्न होताच. शिला एके दिवशी आजारी असल्यामुळे कोपीवर थांबली होती. दुपारी अचानक तिला जास्त गोंगाट ऐकू आला म्हणून तिने कोपीबाहेर पाहिलं तर जे मूल कोपटावर राहिलेली होती, त्यांच्यासोबत गावातील काही तरुण भांडत असल्याचे तिला दिसून आले. तिने भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला, तर त्या गावातील मुलांनी ह्या कोयत्यांच्या पोरावर चोरीचा आल घेतला. दुकानातून काही सामान चोरून आणले आहे म्हणून आम्हाला त्याच्या कोपित शोध घ्यायचा आहे असे सांगितले,पण शिलाने त्यांना कोपित जाऊ दिले नाही. याच गोष्टीचा रंग मनात ठेऊन यातील काही मुलं तिला येत जाता डिवचू लागली. कधी रस्त्यावर मध्येच रस्ता आडवून उभा राहत. तर अपशब्द बोलून, टिंगल टवाळी करून तिची छेड काढू लागले.

एके दिवशी पिण्याचे पाणी आणण्यासाठी शिला एकटीच गेली तर ती वस्ती त्या चिडवणाऱ्यांपैकी एका तरुणाची होती. दुपारच्या वेळेला लोक वस्तीवर नव्हते याचा फायदा घेत त्या तरुणाने शिलाविषयी अश्लील भाषा वापर पाणी दिलं तर तू मला के देणार? मी तुमची तहान भागावतो पण तू माझी तहान तहान भागावणार का? असा सवाल केला. तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. पण तिने गयावया करून, पाया पडून स्वतःची त्या प्रसंगातून सोडवण करून घेतली.

फडावर तिची वाट बघत असलेल्या इतर महिलांना मनात शंका आल्यामुळे त्या लगभग करून तिच्याकडे गेल्या त्या येत असलेल्या पाहून त्यांचा आवाज ऐकून तो तरुण तेथून निघून गेला. शिला देवाचे आजही आभार मानते की, ती त्या प्रसंगातून बचावली. एवढे होऊन सुद्धा पर्याय नसल्याने आज ही शिला अर्ध्या कोयत्याने ऊस तोडी करते. मुलीचे लग्न एकटीने केले. नवरा आजारपणाने अर्ध्यावर साथ सोडून गेला. त्या नंतर देखील तिने हिम्मत ठेऊन काम करून मुलीचे लग्न पुण्यातील कुटुंबात करू दिले. जावई कंपणीत काम करतो. मुले आता शिक्षण घेत आहेत,पण आजही आपल्या सोबत घडलेल्या अनेक वाईट प्रसंगांना मनाच्या कोपऱ्यात बंद करून ठेऊन ती पुढे चालत आहे. आज ही ती ऊसतोडीचे काम "अर्धा कोयता" म्हणून करते.

उदरनिर्वाहासाठी तसेच कौटुंबिक जबाबदारी ही एकटीवरच असल्याने तिला ऊसतोडिच करावी लागते, कारण गावात राहून वर्षभर सतत रोजगार मिळत नाही. उचलीचे पैसे एकामुठीने येतात. त्यातून काही आवश्यक कामाचे नियोजन करता येते. मजुरीवर फक्त बाजारहाट भागतो इतर कामे मागे राहतात म्हणून ऊसतोडी हा पर्याय शिलाने निवडलेला आहे. गरजवंताणा लाज नसते असे शिला म्हणते.

**निष्कर्ष:**

१) अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिलांना ऊसतोडीच्या ठिकाणी दैनंदिन कामकाज करताना अडचणी येतात.

२) आपले काम करण्यासाठी प्रत्येक वेळी इतर सहकाऱ्यांची मदत व सहकार्य मिळतेच असे नाही.
३) अर्ध्या कोयत्याने काम करत असताना,सामाजिक,आर्थिक आणि भावनिक अडचणी येतात.
४) ताण-तणावांचे व्यवस्थापन करण्यात अडथळा येतो.
५) “एकटी बाई” सगळ्यांसाठी उपलब्ध असा समज असणारी मंडळी.
६) अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिलांवर लक्ष ठेऊन गावगुंड, उनाड पोर, यांच्याकडून त्यांचा पाठलाग होतो.
७) अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिलांना आपल्या सोबत होणाऱ्या अन्याया विरुद्ध आवाज उठाव येत नाही.
८) एकीमुळे सर्व टोळीला त्रास होईल याविचारतून मुकाट्याने होणार लैंगिक छळ सहन करतात.
९) होणाऱ्या छळाविरुद्ध आवाज उठविल्यावर अजून भयानक काही घडू शकते ते जिवावर बेतू शकते यामुळे त्या गप्प राहतात.
१०) या कामगारांना कायद्याने संरक्षण नसल्याने, आपल्या गावापासून दूर असलयामुळे पोलिस यंत्रणेची मदत पण घेण्यास भितात. कारण कामाचा वेळ जाऊन आर्थिक नुकसान होते.

**शिफारशी:**

१) ऊसतोडीच्या ठिकाणी राहण्यासाठी योग्य निवास पिण्याचे पाणी आणि लाईट ची व्यवस्था साखर कारखान्याकडून करून देण्यात यावी.
२) कोपीपासून फडापर्यंत जाण्यासाठी व्यवस्था मुकदमाकडून करण्यात यावी.
३) ऊसतोड कामगारांच्या कोपी आणि फडावर पोलिसांच्या घस्त दिवसा व रात्री ही असाव्यात.
४) अर्ध्या कोयत्याने काम करणाऱ्या महिलांसाठी साखर कारखान्याकडून विशेष सवलत असावी.
५) “विशाखा समितीच्या” मार्गदर्शक तत्वांचे पालन पहिलं ऊसतोड कामगारांच्या बाबतीत केले जाते.
६) टोळीत सुरक्षित व निकोप वातावरण राहण्यासाठी साखर कारखान्यांचा हस्तक्षेप असावा.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१) http://baimanus.instoryofwomen-ऊसतोड कामगारांची व्यथा की परवड
२) डॉ.निलम गोऱ्हे : समिति अहवाल
३) हेरंग कुलकर्णी : दारिद्र्याची शोधयात्रा
४) सीमा कुलकर्णी :स्नेहा भर पळणार अर्धा कोयता
५) मकाम संघटना (पुणे) : “आर्थिक,सामाजिक,विवंचनेत जगणाऱ्या ऊसतोड मंजूर महिलांचे दाहक वास्तव!”
६) डॉ. दिपा क्षीरसागर :झुंज तिची पाचटाशी
७) दीपक नगेरगोजे :गुलामांच जीण आंधरतलं जगणं.